# कुंपण आणि भिंत

माणूस खूप पूर्वी रानावनात राहत होता. अन्न, वस्त्र आणि निवारा त्याच्या प्राथमिक गरजा होत्या. पोटाला अन्न, अंगावर कपडा आणि ऊन वाऱ्यापासून तसेच जंगली श्वापदांपासून स्वतःचं संरक्षण करण्यासाठी त्याला हवा होता निवारा, घर.. प्रथम तर गुहेतच राहत असे. जसं जसं त्याच्या गरजा पूर्ण झाल्या आणि त्याचा स्वतःच्या अस्तित्वापलीकडे जाऊन त्याचे कुटुंब, सगेसोयरे, मित्र परिवार, सगेसोयरे वाढले तशी त्याला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाली आणि मग स्वतःची कायम स्वरूपाची जागा, त्यात स्वतःचं घर ह्या गोष्टी आल्या. स्वतःच्या घराची आणि जागेची कायम स्वरूपाची हद्द अधोरेखित करण्यासाठी त्याला त्याच्या मालकीच्या जागेवर कुंपण घालण्याची कल्पना आणि काळानुसार गरज निर्माण झाली. कुंपण हे सहसा मोकळ्या जागेवर, बांधीव बांधकामाच्या सभोवताली अथवा कुठल्याही सार्वजनिक जागेवर असते. कुंपण हे मोकळ्या आवाराला तसेच सीमेभोवती.. कुंपण हे खरं तर तात्पुरते बांधकाम. सीमा निश्चित करण्यासाठी आणि मुख्यद्वाराकडे दिशा निर्देशित करण्यासाठी. कुंपण हे सुरक्षितता आणि मर्यादादर्शक.. परंतु त्यात एक प्रकारचा मोकळेपणा आहे.

कुंपण एखाद्या वेलीचे असू शकते जसे बोगनवेल, जी स्वतःच्या अस्तित्वाने सौंदर्य निर्माण करते अथवा एखाद्या हिरव्यागार झुडपाचे असते. शेताच्या बांधावर सीमा निश्चित करण्यासाठी काही झाडं लावतात ज्यामुळे सीमा निश्चित होतेच पण शेताला नैसर्गिक सौंदर्य प्राप्त होते. सार्वजनिक बगीचा, खेळाचे मैदान आणि इतर मोकळ्या जागांना कुंपण घातल्याने आतल्या भागातील सौंदर्य रस्त्यावरून न्याहाळता येते. असं हे कुंपण एक प्रकारचा मोकळेपणा दर्शवते.

भिंत सुध्दा सीमा निर्देशित करते परंतु ते एक पक्के बांधकाम. भिंत कुंपणाप्रमाणे मोकळी नाही, त्यात एक नकारात्मकता आहे. कुंपण घातले तरी अनोळखी माणूस अथवा कोणीही गरजेनुसार आत प्रवेश करू शकतो मात्र भिंत अश्या सहज प्रवेशाला मज्जाव घालते. भिंत ही दोन जागेतील कायदेशीर विभागणी करते आणि जणू अनोळखी व्यक्तीला trespasser अर्थात अतिक्रमणकर्ता म्हणून कायदेशीर शिक्का मारते आणि उल्लंघन केल्यास ती व्यक्ती कायद्यानुसार शिक्षेस पात्र ठरते. बरेच दिवस एकोप्याने राहत असलेले कुटुंब, मालमत्तेच्या वादातून जागेत भिंत घालून घेतात. दोन जागांमध्ये एकदा भिंत घातली गेली की जणू ती कुटुंबे एकमेकांपासून दुरावतात... मनाने आणि नात्याने. हीच ती भिंत दुभंगलेल्या मनाचे प्रतिनिधित्व करते. ह्या भिंतीमुळे फक्त जागेची विभागणी होत नाही तर नातेसंबंधांत जणू 'उभी भिंत' निर्माण करते. भिंत फक्त जागेची आणि नात्याची विभागणी करत नाही तर मनही दुभंगतात. भिंत कलह निर्माण करते. नात्यात दुरावा निर्माण करते.

भिंत हे जणू नकारात्मकतेचे द्योतक आहे. जिथे विश्वास संपला तिथे भिंतीचं अस्तित्व आलं. कारागृहाला मोठीच्या मोठी भिंत असते, कैदी पळून जातील ह्या भीतीने. पूर्वीच्या काळी राजे संरक्षणासाठी किल्ले बांधत. परंतु त्या व्यतिरिक्त राज्याच्या संरक्षणासाठी आणि शत्रूपासून बचाव करण्यासाठी मोठमोठ्या भिंती बांधल्या गेल्या. जगातील सात आश्चर्यांपैकी चीनची भिंत ही अद्भुत बाब आहे. सुमारे पावणे पाच हजार किमी लांबीची ही भिंत बांधली गेली. भारतातही राजस्थानात, कुंभळगड येथे सुमारे ३२ किमी लांबीची भिंत आहे. त्यामुळे भिंत हे एक शत्रूपासून बचावाचे साधन ठरते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी कित्येक किल्ले जिंकत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि त्या किल्ल्यांच्या रक्षणासाठी बुरुज आणि दणकट भिंती बांधल्या. अगदी सागरी संरक्षणासाठी जंजिरा, सिंधुदुर्ग असे जलदुर्ग उभारताना समुद्रात भक्कम भिंती बांधल्या.

देशाच्या सीमा सहसा, एखादी मोठी नदी, मोठी पर्वतरांग अथवा काही भौगोलिक अस्तित्वावर आखल्या जातात. त्याचा मान दोन्ही देशांचे नागरीक राखतात. काही सपाट पृष्ठभागावरील देशांच्या सीमा काही चिन्हांकित पद्धतीने निश्चित केलेल्या असतात. परंतु ज्या दोन देशांमध्ये सदृढ आणि निकोप संबंध शिल्लक राहत नाही अश्यावेळी देशाच्या सीमेवर भिंत बांधली जाते. पूर्व आणि पश्चिम जर्मनीच्या मध्ये बर्लिन येथे अशीच मोठी भिंत उभारली गेली ज्यामुळे जर्मनीचे दोन तुकडे झाले होते. कालानुरूप पूर्व आणि पश्चिम जर्मनी मधील राजनैतिक संबंध सुधारल्यानंतर हीच 'बर्लिनची भिंत' जमीनदोस्त केली आणि दोन दुभंगलेले देश पुन्हा एकत्र झाले. अशीच एक भिंत मेक्सिको आणि अमेरिकेच्या सीमेवर आहे, वाढती घुसखोरी रोखण्यासाठी.

काही भिंती दृश्य स्वरूपाच्या असतात तर काही अदृश्य स्वरूपात असतात. ह्या अदृश्य रूपातील भिंती तेवढ्याच घातक स्वरूपाच्या असतात - जसे जातीपातीच्या भिंती, आर्थिक स्तर अधोरेखित करणाऱ्या भिंती, उच्च नीच्चता दर्शविणाऱ्या भिंती, समाजातील अनिष्ठ रूढी आणि परंपरा जपणाऱ्या भिंती, धर्म आणि आचरणाच्या भिंती.. अश्या भिंती समाजात तेढ निर्माण करतात. अश्या अदृश्य भिंतींनी समाज दुभंगला जातो, तेढ निर्माण होते.

कधी कधी जवळच्या नात्यात अचानक भिंत निर्माण होते. बदलती जीवनशैली, संवादाचा अभाव, एकमेकांना पुरेसा वेळ न दिल्याने निर्माण होणारे नात्यातील गैरसमज आणि त्या गैरसमजातून निर्माण होणारा दुरावा... त्यातून नात्यात एक अदृश्य भिंत निर्माण होते. अबोला आणि मौन तसेच अहंकार ह्यामुळे ह्या अदृश्य भिंतीची उंची वाढत जाते. अश्यावेळी संवाद साधण्याचा प्रयत्न करायला

हवा.. अगदीच लगेच भिंत पडण्याची शक्यता नसली तरी संवादाचा दरवाजा काढता येतो, जेणेकरून संवादाला सुरुवात होते आणि गैरसमज दूर होतात. त्यातूनच पुढे सुसंवाद निर्माण होऊन नातेसंबंध पुनर्स्थापित होण्यास मदत होते.. त्यानंतर त्या नात्यात पडलेली अदृश्य भिंत कधी तुटून पडते, ते कळत देखील नाही. चला तर सगळ्यांनी ह्या नात्यात पडलेल्या अदृश्य भिंती तोडून टाकत नव्याने नाती स्थापित करण्यासाठी पुढाकार घेऊया.

'Let's retie the connection.'

**- मनोज मोहन कुरुंभटी**